दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २२७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.२९ मार्च २०२५


।।सुविचार।।

कोणाच्याही सावलीखाली उभा राहिल्यावर
स्वतःची सावली कधीच निर्माण होत नाही.
स्वतःची सावली निर्माण करण्यासाठी
स्वतः उन्हात उभे रहावे लागते.

## थोडक्यात

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा उद्या महाराष्ट्र दौरा



**दि.२८, नवी दिल्ली :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ३० मार्च रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असून, नागपुरातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री श्री.मोदी यांच्या हस्ते सोलार डिफेन्स आणि एअरोस्पेस लिमिटेड येथे संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक प्रकल्पांचे उद्घाटन होणार आहे. यामध्ये अनमॅन्ड एरियल व्हेईकल्ससाठी १२५० मीटर लांबीची विशेष धावपट्टी आणि लोइटरिंग म्युनिशन चाचणीसाठी अत्याधुनिक सुविधा राष्ट्राला समर्पित केली जाणार आहे. तसेच नागपुरातील माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरच्या विस्तार प्रकल्पाची पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत २५० खाटांचे रुग्णालय, १४ बाह्यरुग्ण विभाग आणि अत्याधुनिक १४ ऑपरेशन थिएटर उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे नागपूर आणि विदर्भातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या नेत्रचिकित्सा सुविधा उपलब्ध होणार आहेत.

प्रधानमंत्री श्री.मोदी दीक्षाभूमी येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'प्रतिपदा' कार्यक्रमानिमित्त स्मृती मंदिराला भेट देऊन संघ संस्थापकांना अभिवादन करतील.

# शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी! नमो शेतकरी योजनाचा हप्ता...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, मुंबई :** मो शेतकरी योजनेच्या लाभाची वाट पाहाणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून 'नमो शेतकरी महासन्मान निधी' – ६व्या हप्त्याचे ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबांना थेट लाभ हस्तांतरण केले जाणार असल्याबद्दल माहिती देण्यात आली आहे.

**आजपासून मिळाणार लाभ !**

'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'च्या सहाव्या हप्त्यांतर्गत उद्यापासून ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबांना लाभ वितरित केला जाणार आहे. या अंतर्गत २१६९ कोटी रुपये इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रिय बँक खात्यात थेट जमा होणार आहे, असे मुख्यमंत्री कार्यालयाकडून करण्यात आलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सहावा हप्ता निधी वितरणासंबंधी माहिती राज्याच्या मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. शेतक-यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी



योजना फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/– प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रति वर्षी रू. ६०००/– त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येतात. प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी 'नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी राज्यात सन २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये पी.एम. किसान योजनेच्या प्रतिवर्ष, प्रति शेतकरी ६ हजार रुपयाच्या लाभामध्ये महाराष्ट्र शासन आणखी ६ हजार रुपयांची भर घालत आहे.

त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना एकंदरीत १२ हजार रुपये प्रतिवर्षी लाभ दिला जा आहे. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी शिर्डी येथून नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता देण्यात आला होता.

आज अखेर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत एकूण ५ हप्ते वितरीत करण्यात आलेले असून राज्यातील ९०.८६ लाख शेतकरी कुटुंबांना रू. ८९६१.३१ कोटीचा लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात थेट जमा करण्यात आलेला आहे. पंतप्रधान मोदींच्या हस्ते डिसेंबर, २०२४ ते मार्च, २०२५ या कालावधीतील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. यावेळी महाराष्ट्र राज्यातील एकूण ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रू. १९६७.१२ कोटी निधीचा लाभ वितरीत करण्यात आलेला आहे. या व्यतिरीक्त त्यानंतरही केंद्र शासनाने पीएम किसान योजनेअंतर्गत एकूण ६५,०४७ लाभार्थींना लाभ अदायगीचे नियोजन केले आहे. त्यानुसार राज्यातील ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा सहाव्या हप्त्याचा सुमारे रक्कम रू. २१६९ कोटी लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात जमा करण्यात येत आहेत, अशी माहिती सरकारकडून देण्यात आली आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील दोन गावांसाठी टँकर मंजूर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, बुलडाणा :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील दोन गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये भालगाव व कोलारा या ठिकाणी ठरवून दिल्याप्रमाणे टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती चिखली उपविभागीय अधिकारी यांनी दिली. भालगाव येथे १ हजार ६२० पशुधन व ३ हजार २७३ लोकसंख्येसाठी एक टँकर ९६ हजार ६०० लिटर्स पाणी पुरवठा करणार आहेत. कोलारा गावाला ४ हजार पशुधन व ४ हजार ८५६ लोकसंख्येसाठी एक टँकर १ लक्ष ७६ हजार ६६० लिटर्स पाणी दररोज टँकरव्दारे पुरवठा



करेल. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता या ५ गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अक्षराज मीडियाच्या पत्रकारास भर चौकात मारहाण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, दिवा (ठाणे) :** शुक्रवार, दिनांक २८ मार्च २०२५ रोजी अक्षराज मीडियाचे कल्याण ग्रामीण विधानसभा पत्रकार विनोद वास्कर यांना दुपारच्या सुमारास शिळफाट्याच्या भर चौकात राहुल काटे आणि जितू आलीमकर या गावगुंडानी मारहाण केली आहे. विनोद वास्करयांना त्यांनतरउपचारासाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गावागावातील बातम्या प्रकाशित करत असल्याने मारहाण झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी शिळ डायघर पोलीस ठाण्यावर धडक दिली आहे.पत्रकाराचा मेडिकल रिपोर्ट आल्यानंतर या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेऊन तक्रार दाखल केली जाईल. अशी माहिती शिळ डायघर पोलिसांनी दिली. तसेच पोलिसांकडून आरोपींचा शोध देखील सुरू करण्यात आला आहे.

# पुण्याच्या मध्य भागात उद्या मिरवणुकीने नववर्षाचे स्वागत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे गुढीपाडव्यानिमित्त शहराच्या मध्य भागात रविवारी (३० मार्च) भव्य मिरवणूक काढून नववर्षाचे स्वागत करण्यात येणार आहे. महात्मा फुले मंडई येथील लोकमान्य टिळक पुतळ्यापासून सकाळी साडेआठ वाजता सुरू होणाऱ्या मिरवणुकीमध्ये पारंपरिक पेहरावात हजारो पुणेकर सहभागी होणार आहेत. ग्रामदेवता श्री तांबडी जोगेश्वरी मंदिराजवळ ग्राम गुढीची उभारणी करण्यात येणार आहे. अशी माहिती समितीचे संयोजक राघवेंद्र मानकर व सहसंयोजक अश्विन देवळणकर यांनी दिली.

लोकमान्य टिळक पुतळ्यापासून सुरू होणाऱ्या मिरवणुकीचा तुळशीबाग राममंदिर, शनिपार, लिंबराज महाराज चौक, आप्पा बळवंत चौक असा मार्ग असून तांबडी जोगेश्वरी मंदिर येथे समारोप होणार आहे. यावेळी रा.स्व. संघाचे अधिकारी व विविध क्षेत्रात नैपुण्य मिळवलेल्या विविध महिलांच्या हस्ते गुढी उभारण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीनिमित्त त्यांना अभिवादन करणारा अहिल्यादेवी होळकर रथ, भजनी मंडळ, पर्यावरणचे भान राखून प्रबोधनपर 'पाणी' विषयावरील रथ, छत्रपती शिवाजी महाराज रथ, तसेच वंदे मातरम काव्याच्या दीडशेव्या वर्षानिमित्त या काव्याची माहिती देणारा रथ, प्रभू श्रीराम रथ, ढोल-ताशा पथक, शंख पथक, बँडपखक, मर्दानी खेळ तसेच वेत्रचर्म प्रात्यक्षिके सादर करणारे पथक मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. सोमवंशीय क्षत्रिय कासार श्री कालिकादेवी



संस्थान तसेच मराठी अभिजात भाषा रथ मिरवणुकीत असेल, अशी माहिती समितीचे संयोजक राघवेंद्र मानकर आणि सहसंयोजक अश्विन देवळणकर यांनी शुक्रवारी दिली. ऐतिहासिक, आध्यात्मिक, स्वातंत्र्यलढ्यातील थोर व्यक्तिमत्त्वांचा आदर्श ठेवून केलेल्या वेशभूषेतील नागरिक मोठ्या संख्येत सहभागी होतील. पुणेकरांनी भगव्या टोप्या, भगवे फेटे घालून, धर्मध्वज (भगवा) हातात घेऊन मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कलावंत गुढी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेतर्फे रविवारी (३० मार्च) यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे सकाळी दहा वाजता सांस्कृतिक कलावंत गुढी उभारली जाणार आहे. मराठी नववर्ष आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'कुटंब कीर्तन' या नाटकातील कलाकार वंदना गुप्ते आणि संकर्षण कऱ्हाडे यांच्या हस्ते गुढी पूजन होणार असून माजी नगरसेवक पृथ्वीराज सुतार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती नाट्य परिषदेच्या कोथरूड शाखेचे अध्यक्ष सुनील महाजन यांनी दिली.

# दोन कोटीच्या खंडणीसाठी अपहरण झालेल्या डोंबिवलीतील बालकाची सुटका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, डोंबिवली :** डोंबिवली जवळील रिजन्सी अनंतम गृहसंकुलात राहत असलेल्या कोमल महेश भोईर यांच्या सात वर्षाच्या बालकाची शुक्रवारी सकाळी शाळेत जात असताना दोन कोटी रूपयांच्या खंडणीसाठी अपहरण करण्यात आले होते. मानपाडा पोलिसांनी तत्पर तपास करून मोठ्या कौशल्याने शहापूर जवळून अपहृत बालकाची सुटका केली. याप्रकरणात चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यात दोन अल्पवयीन मुलांचा सहभाग आहे. या बालकाला शाळेत सोडणाऱ्या वीरेन पाटील (२५) या रिक्षा चालकाने आपल्या साथीदारांच्या मदतीने हे कृत्य केल्याचे तपासात उघड झाले.

मुलाचे वडील महेश भोईर विकासक आहेत. या मुलाचे अपहरण करून त्याला जीवे ठार मारण्याची धमकी भोईर कुटुंबीयांना दिली तर आपणास दोन कोटी रूपये सहज मिळतील असा विचार करून अपहरणकर्त्यांनी या बालकाचे अपहरण केले होते, असे पोलीस तपासात पुढे आले आहे. शुक्रवारी सकाळी साडे सात वाजता कोमल महेश भोईर यांचा मुलगा रिक्षेने शाळेत जाण्यासाठी निघाला. कोमल भोईर यांना अपहरणकर्त्यांनी दोन कोटी रुपये द्या, अन्यथा मुलाला ठार मारू, अशी धमकी त्यांच्या संपर्क क्रमांकावर दिली. मुलाचे अपहरण झाल्याचे समजताच हादरलेल्या भोईर यांनी तात्काळ मानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने याने घडला प्रकार सांगितला. हे प्रकरण नाजूक असल्याने उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे कादबाने यांनी पोलिसांची पाच तपास पथके तयार करून वेगळ्या दिशांना त्यांना पाठविले. मुलाला शाळेत सोडणारा वीरने पाटील याने हे कृत्य केल्याचा संशय घेऊन पोलिसांनी त्या दिशेने तपास सुरू केला.

तांत्रिक माहितीच्या आधारे वीरेनचा माग पथकांनी काढला. तो मुंबई नाशिक महामार्गावरील शहापूर परिसरात असल्याचे पोलिसांना समजले. पोलिसांच्या पथकांनी शहापूर भागात वीरेनचे ठिकाण शोधून त्याला बालकासह ताब्यात घेतले. मुलाच्या जीवाला धोका म्हणून पोलिसांनी या प्रकरणात अतिशय सावधगिरी बाळगली होती. मुलाचे वडील विकासक आहेत. आपल्याला दोन कोटी रूपये सहज मिळतील, असा विचार रिक्षा चालक वीरेन पाटीलने केला होता. त्याचा डाव पोलिसांनी साडे तीन तासाच्या आत उधळला.

बालकाला पोलिसांनी सुखुरूपपणे अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सोडवून त्याचा ताबा पालकांना दिला. याप्रकरणात पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतले आहे. एक रिक्षा, एक चाकू जप्त करण्यात आला आहे. त्यांच्या विरुध्द खंडणी, अपहरणाचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, साहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र चोपडे, संपत फडोळ, अभिजीत पाटील, स्वाती जगताप, हवालदार सुनील पवार, राजेंद्र खिल्लारे, बाबा जाधव, संजू मसाळ, शिरीष पाटील, विकास माळी, सचिन साळवी, सुशांत पाटील यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

अक्षराज

# संपादकीय



## शितावरून भाताची परीक्षा

न्यू इंडिया को ऑप. बँकेवर गेल्या महिन्यात (फेब्रुवारी २०२५) रिझर्व्ह बँकेने कलम ३५ ए अंतर्गत निर्बंध लादले. त्यामुळे माध्यमांतील काहींनी, संपूर्ण सहकारी बँकिंग क्षेत्राच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सारासार विचार न करता, सहकारी बँकांवर टीका करणे सोपे आहे कारण त्या सॉफ्ट टार्गेट आहेत, त्यांना कोणी वाली नाही, त्यांचा कोणताही दबाव गट नाही. घोटाळा करणाऱ्या कोणत्याही बँकेचं, कर्मचाऱ्यांचं समर्थन कोणीही करू शकत नाही. तसा या लेखाचा उद्देशही नाही. मात्र राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये हजारो कोटींचे घोटाळे होऊनही त्या बँकांवर बँकिंग नियमन कायदा ३५ ए ची कारवाई करण्यात आलेली ऐकिवात नाही. फार तर त्या बँकांवर पी.सी.ए.) अंतर्गत देखरेख ठेवण्यात आली. पण त्याबाबत जनतेत घबराट पसरवणाऱ्या बातम्या माध्यमातून देण्यात आल्या नाहीत, कारण एकच, या बँकांना सरकारचं संरक्षण आहे. कल्पना करा, या बँकांना सरकारचं संरक्षण नसतं तर? या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक ट्रेंड ॲण्ड प्रोग्रेस रिपोर्टमधील सहकारी बँकांची माहिती उद्धृत करण्याचा हा प्रयत्न. रिझर्व्ह बँकेने भारतातील सर्व बँकांबाबत तसेच नॉन बँकिंग कंपन्यांविषयी सविस्तर माहिती देणारा अहवाल अलीकडेच प्रसिद्ध केला आहे. त्यात खासगी, व्यापारी, सहकारी बँकांची तसेच नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांची ३१ मार्च २०२४ अखेरची व ग्रामीण सहकारी संस्थांची तुलनात्मक आर्थिक स्थिती प्रसिद्ध केली आहे. त्यातील नागरी सहकारी बँकांविषयीची माहिती सर्व संबंधितांना व्हावी यासाठी हा लेखन प्रपंच.

व्यवसाय मिश्रण

रिझर्व्ह बँकेच्या या अहवालानुसार देशभरात १४७२ नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. या बँकांमध्ये एकूण ५,५५, ४६९/- कोटी रुपयांच्या ठेवी असून ३,४६,९०३/- कोटी रुपयांची कर्जे त्यांनी वितरित केली आहेत. या बँकांकडे एकूण ७,०७,६६९ कोटी रुपयांची मालमत्ता शिल्लक आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत ३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंदात ४ ची वाढ दिसत आहे. या सहकारी बँकांच्या ठेवींमध्ये मार्च, २०२४ अखेर ४ वाढ झाली असून, सप्टेंबर २०२४ अखेर ४.४ ची वाढ झाल्यामुळे, ठेव वाढीचे सातत्य दिसत आहे. सहकारी बँकांनी त्यांच्या ग्राहकांना दिलेल्या कर्जांमध्ये मार्च, २०२४ अखेर ५ ची वाढ झाली असून, सप्टेंबर २०२४ अखेर हाच वाढीचा वेग ६.२ नोंदवला आहे. व्यापारी बँकांच्या ठेवींमध्ये मार्च, २०२४ अखेर १३.४ ची वाढ झाली असून कर्जांमध्ये १६ वाढ झाली आहे. व्यापारी बँकांच्या देशभर असलेल्या शाखांची संख्या १,६०,००० हून अधिक असून, त्या तुलनेत सहकारी बँकांच्या शाखांची संख्या फक्त २३,१०० आहे. देशभर शाखांचे जाळे, तसेच व्यवसाय प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हे बँकांच्या प्रगतीचे वैशिष्ट्य आहे.

सहकारी बँकांच्या ठेवी व कर्जांचे गुणोत्तर ६२.५० तर व्यापारी बँकांच्या बाबतीत हेच गुणोत्तर ७६.८० आहे. सहकारी बँकांनी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण फक्त ०.८ असून व्यापारी बँकांच्या बाबत हेच प्रमाण ९ आहे. सहकारी बँकांच्या गुंतवणुकीतील वाढ सातत्यपूर्ण आहे. सहकारी बँकांची एकूण गुंतवणूक १,९३,८१४/- कोटी रुपये आहे. ९० सहकारी बँकांची गुंतवणूक, वैधानिक तरलता प्रमाणपत्रांमध्ये आहे, तर व्यापारी बँकांचे हेच प्रमाण ८३ आहे. अनुत्पादित कर्जांचे प्रमाण

ढोबळ अनुत्पादित कर्जांच्या प्रमाणावर बँकांच्या कर्जाची गुणवत्ता ओळखता येते. सहकारी बँकांमध्ये गेली तीन वर्षे सातत्याने ढोबळ अनुत्पादित कर्जाच्या गुणोत्तरात सुधारणा दिसून येत आहे. गतवर्षी (मार्च २०२३) ८.८ असलेले ढोबळ अनुत्पादित कर्जाचे गुणोत्तर मार्च २०२४ अखेर ७.३ झाले आहे. तर नक्त अनुत्पादित कर्जांचे गुणोत्तर २.२ वरून १.२ झाले आहे. त्यामुळे तरतुदींचे गुणोत्तर ७७.१ वरून ८४.६ वर पोहोचले आहे.


# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ.नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले.

कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना



या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेले. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार विलास तरे यांची तारांकित प्रश्नांची सरबत्ती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, मुंबई :** महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे नुकतेच पार पडलेले अर्थसंकल्पीय अधिवेशन विविध घडामोडींनी गाजले. यात विधानसभेत १३१ बोईसर (अ.ज) मतदारसंघाचे आमदार विलास तरे यांनी पालघर जिल्ह्याच्या विविध समस्या व प्रश्नांना विधानसभेच्या पटलावर प्रभावीपणे मांडत एक वेगळी छाप पाडली असून या अधिवेशनात सर्वाधिक तारांकित प्रश्न विचारून जनतेच्या अपेक्षा आणि अडचणी अधोरेखित करत प्रश्न विचारायचा विक्रम आपल्या नावे नोंदवली आहे.

यावेळी आमदार तरे म्हणाले की, महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज १५ दिवस चालले. विधानसभेतील व्यासपीठाचा वापर करून जिल्ह्यातील जनतेच्या समस्या सरकारपुढे मांडण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला असून त्यात आम्ही पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाज, शेतकरी, कामगार, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, रस्ते अशा विषयाशी निगडीत साधारण ८६ तारांकित प्रश्न उपस्थित केले असता त्यापैकी साधारण २२ प्रश्न



चर्चेला आले होते. हे प्रश्न केवळ लेखी उत्तरापुरते मर्यादित नसून, त्यामागे जिल्ह्यातील जनतेच्या वास्तव जीवनातील अडचणी आहेत. आदिवासी भागात मूलभूत सुविधा, रस्ते, आरोग्य केंद्रे, शिक्षण संस्थांची कमतरता, रोजगाराच्या संधींचा अभाव, शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळवून देण्याची आवश्यकता, तसेच औद्योगिक भागात कामगारांच्या सुरक्षितता आदी विषय उपस्थित केले होते. यापुढे प्रश्नांच्या अनुषंगाने संबंधित खात्यांकडे पाठपुरावा केला जाईल. आणि शासनाच्या धोरणनिर्मितीतून जिल्ह्याच्या विकासाला गती मिळावी आणि लोकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची दखल विधानसभेत व्हावी त्याचबरोबर हे प्रश्न फक्त आकडेवारीपुरते मर्यादित नाहीत, तर जनतेच्या जीवनाशी संबंधित आहेत. आम्हाला शासनाकडून उक्त प्रकरणी भविष्यात ठोस निर्णय घेण्यास मदत होणार असल्याचा विश्वास आ. तरे यांनी व्यक्त केला आहे.

तसेच, आमदार तरे यांची ही कामगिरी जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नांना विधीमंडळात आवाज मिळवून देणारी ठरली आहे. त्यांनी या अधिवेशनाद्वारे सरकारकडून अनेक बाबींवर लक्ष वेधून आणण्यास यश मिळवले असून, या प्रश्नांच्या पाठपुराव्याद्वारे त्यावर ठोस निर्णय घेतले जातील, असा विश्वास आ. तरे यांनी व्यक्त केला. विधानसभेत प्रश्न मांडून त्यांनी आपले सातत्य आणि जनतेच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता अधोरेखित करत २२ प्रश्नांना सभागृहात प्रत्यक्ष चर्चा आणि उत्तराच्या स्वरूपात वाचा फुटली आहे. दरम्यान आ. स्नेहा दुबे- पंडित - ३, आ. राजन नाईक - १३, आ. राजेंद्र गावित - १९, आ. विलास तरे - २२, आ. विनोद निकोले - २, आ. हरीश्चंद भोये - ५ असे तारांकित प्रश्न चर्चेला आले होते. राजकारणात प्रश्न विचारणे ही केवळ औपचारिकता नसून ती जनतेच्या आवाजाची ताकद असते, हे आमदार तरे यांनी या अधिवेशनात सिद्ध केले आहे. अधिवेशन संपल्यानंतरही या मुद्द्यांवर माझा पाठपुरावा सुरूच राहणार असून, जनतेच्या हितासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार आमदार विलास तरे यांनी व्यक्त केला आहे.

## विनोद..

ताळ तंत्र विसरला
घसरला तो विनोद
शब्द विसरे मर्यादा
लुप्त झाला अमोद

आसूड मारे सपाप
चेष्टा मस्करी प्रतोद
व्यक्तीश : टिकास्त्रे
कुणीदिले अनुमोद

श्रोते वाजवे टाळ्या
बोलणेअसून दुर्बोध
निखळता विसरली
गायब भाषा सुबोध

हिडीसपणा वाढला
निर्माण होतो क्रोध
व्यंगावर बोटे ठेवून
स्वताचीकबर खोद

अकारण फेके राडा
घेऊ वाटे प्रति शोध
अरेकुठे चुकेआपण
कधीतर घ्यावाशोध

व्यक्तीस्वातंत्र्य मिळे
कोणकरणारं विरोध
अंकुश ठेवा जरासा
आताहवायं गतिरोध

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त जन्मभूमी ते कर्मभूमी ज्ञानज्योत यात्रेस पालम येथून प्रारंभ

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२८, पालम (परभणी) :** सगरोळी तालुका बिलोली जिल्हा नांदेड येथील कर्मयोगी बाबासाहेब देशमुख उर्फ के.ना. यांचे जन्मशताब्दी वर्ष २७ मार्च २०२५ ते २७ मार्च २०२६ असे साजरा करण्यात येणार आहे. कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांचा जन्म पालम येथील देशपांडे वाड्यात झालेला आहे. बाबासाहेब देशमुख हे अत्यंत शिस्तप्रिय व्यक्तिमत्व असून सगरोळी जिल्हा नांदेड येथे ग्रामीण भागात शाळा काढून तेथील गोरगरीब जनतेला ज्ञानदानासारखे पवित्र कार्य त्यांनी केले. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्कारही मिळालेला आहे.

आज दि.२८ मार्च रोजी पालम येथील देशपांडे यांच्या वाड्यात एका भव्य कार्यक्रमात दीप प्रज्वलित जन्मशताब्दी सोहळ्याला सुरुवात करून नरसी ते सगरोळी पर्यंत मशाल (ज्ञानज्योत) नेण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात मान्यवरांनी बाबासाहेब देशमुख यांनी केलेल्या सामाजिक कार्याची जाणीव पालमकरांना



करून दिली. त्यांनी आयुष्यभर जातीवाद,वर्णवाद यांना विरोध करत सर्व जाती धर्माच्या जनतेला शिक्षण मिळुन जिवनात सक्षम व्हावे यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.

या कार्यक्रमाला कर्मवीर बाबासाहेब देशमुख यांचे चिरंजीव देविदासराव देशमुख, आशाताई देशमुख, विनोद देशमुख, स्मिता देशमुख, प्रमोद देशमुख, सुनंदाताई देशमुख, विलास देशपांडे, सुलोचनाताई देशमुख, अनुराधा देगलूरकर, भुजंगराव पालमकर, जयंत जकाते तसेच परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक गणेशराव रोकडे, नगराध्यक्ष वसंतराव सिरस्कर, नगरसेवक लक्ष्मणराव रोकडे, कैलास रुद्रवार, बाबासाहेब जामगे, शिवाजीराव दिवटे, लिंबाजीराव टोले, पांडुरंग रुद्रवार, दिलीप रुद्रवार, राजू शेठ पत्की, मुंजाभाऊ रोकडे, प्रमोद इनामदार, संतोष पत्की सह गावातील असंख्य नागरिक व ब्रह्मवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदुदेवा जोशी यांनी केले, संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन मनोज देशपांडे यांनी केले.

# झाडांवर लायटिंग करणाऱ्यांवर होणार दंडात्मक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रात वृक्षांवर खिळे ठोकून जाहिराती करण्यात येत असल्याचे तसेच काही वृक्षांवर विद्युत रोषणाई करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई यामुळे वृक्षांना धोका निर्माण होत असून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षराजीवर परिणाम होऊन पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाच्या वतीने दि.२७ जानेवारी २०२५ रोजीचा ठराव क्र.७४६१ अन्वये वृक्षांवर खिळे ठोकणे, विद्युत रोषणाई करणे व वृक्षास इजा पोहचविणाऱ्या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक यांचेवर दंडात्मक कारवाई करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार अशा नागरिक /संस्था / व्यावसायिक यांचेकडून प्रतिवृक्ष रुपये १०,०००/- इतका दंड आकारणेबाबत सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांचेमार्फत कारवाई करण्यात येणार आहे.

अशा प्रकारच्या कारवाईमुळे वृक्षांवर खिळे ठोकणे व विद्युत रोषणाई करून पर्यावरणास बाधक ठरणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध होईल तसेच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांचे व पर्यावरणाचे रक्षण होईल. तरी नागरिकांनी नवी मुंबई शहराच्या पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सुहास मनोहर यांची कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून पदोन्नती



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२८, डोंबिवली (ठाणे) :** मध्य रेल्वे डोंबिवली रेल्वे सुरक्षा बल कर्तव्यनिष्ठ शांत स्वभावाचे सुहास मनोहर यांनी डोंबिवलीकरांसाठी मौल्याचे भूमिका निभावल्या असून ते मुंबई रेल्वे सुरक्षा बल वरिष्ठ निरीक्षक म्हणून पदोन्नती झाली आहे. त्यांना डोंबिवली रेल्वे सुरक्षा बल वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊतांनी पुढील वाटचालीसाठी अभिनंदन व शुभेच्छा ही दिल्या आहेत.

## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम विषयक खाजगी डॉक्टरांची कार्यशाळा संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** जागतिक क्षयरोग दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षयरोग विषयी व्यापक जनजागृती करणेकरीता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. क्षयरोगाचे निर्मूलन करणेकरीता शासकिय व खाजगी आरोग्य सेवा यांनी एकत्रित काम करणे महत्वाचे आहे. त्याच धर्तीवर नमुंमपा आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (एनआयएमए) यांच्या संयुक्त विद्यमाने खाजगी आयुष वैद्यकीय व्यवयायिक यांची क्षयरोग विषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळे करीता आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. धनवंती घाडगे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रविण कटके, वैद्यकीय अधिकारी डॉ. निनाद काकडे, डॉ. प्रदिप परदेशी व एनआयएमए अध्यक्ष डॉ. विनायक म्हात्रे व एकूण ५४ खाजगी आयुष वैद्यकीय व्यावसायिक उपस्थित होते.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांनी आयुष वैद्यकीय व्यवयायिक ना संबोधित केले व त्यांना क्षयरोग आजाराचे दुरीकरण करणेकरीता बाह्यरुग्ण विभागामध्ये येणाऱ्या जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्णांची तपासणी करून घेण्याचे अवाहन केले. शहर क्षयरोग अधिकारी डॉ. प्रविण कटके, वैद्यकीय अधिकारी डॉ. निनाद काकडे व डॉ.प्रदिप परदेशी यांनी उपस्थित डॉक्टरांना नमुंमपा अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम मार्फत देण्यात येणाऱ्या विविध मोफत निदान, औषधोपचार व प्रतिबंधात्मक उपचाराबाबत सेवेची माहिती दिली. एनआयएमए अध्यक्ष डॉ.विनायक म्हात्रे यांनी क्षयरोग विषयक कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल नमुंमपा आरोग्य विभागाचे विशेष आभार व्यक्त केले. नमुंमपा, खाजगी संस्था व नागरिक एकत्रित आल्यास नवी मुंबईतून क्षयरोगाचे समुळ उच्चाटन करणे शक्य आहे. तरी नवी मुंबई क्षयरोग मुक्त करणेकरीता खाजगी संस्था व नागरिकांनी सर्वोतपरी सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

## शासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करावी - पालकमंत्री बावनकुळे



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, अमरावती :** जनतेला सेवा देणारे पोलिस हे एक महत्वाचे विभाग आहे. त्यामुळे पोलिसांनी नागरिकांशी संवाद ठेऊन शासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. पोलिस आयुक्त कार्यालयात आज पोलिस विभागाचा आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रविण तायडे, प्रविण पोटे, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, येत्या काळात सण उत्सवाचे वातावरण असणार आहे. त्यामुळे अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सर्व यंत्रणांनी सजग राहावे. प्रामुख्याने समाज माध्यमांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. पोलिसांनीही व्हॉटसअॅप ग्रुप तसेच काही संशयित नागरिकांच्या हालचालीवर लक्ष ठेवावे. यासाठी सायबर कक्ष सक्षम ठेवावा. यातून समाज माध्यमांवरील हालचालींबाबत दक्ष रहावे. यातून अलर्ट राहता येईल.

गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही तसेच कृत्रिम बुद्धीमत्तेचा उपयोग करावा. पोलिस दलाचे आधुनिकीकरण करताना पुढील दशकाचा विचार करावा. त्यानुसार पद किंवा पायाभूत सुविधांचा प्रस्ताव तयार करावा. येत्या काळात १२ ते १८ वर्षे वयोगटातील मुले गुन्हेगारी टोळ्यांच्या निशाण्यावर असल्याने मुलांमधील गुन्हेगारी बिंबवणारे व्हीडीओ किंवा कारवायांवर लक्ष ठेवण्यात यावे. पोलिसांना गुन्हे उकलसाठी मदत व्हावी, पोलिस मित्र किंवा शासनातर्फे नेमण्यात येणाऱ्या विशेष कार्यकारी अधिकारी यांची मदत घ्यावी. त्यामुळे पोलिसांना समाजामध्ये घडणाऱ्या अनुचित प्रकाराची माहिती गतीने मिळण्यास मदत होईल, असे सांगितले.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी दिनांक २८ मार्च २०२५ रोजी वैदर्भी या बचतगट उत्पादीत वस्तूंच्या मॉलचे उद्घाटन केले. सुरवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांनी कोनशिलेचे अनावरण केले. तसेच मॉलचे फित कापून उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी मॉलमधील बचतगटांनी उत्पादित केलेल्या खाद्यपदार्थांची पाहणी केली.

# अहिल्यानगर जिल्ह्यात सरपंच पदाच्या आरक्षणासाठी तयारी सुरू

## ईश्वरी चिठ्ठी ठरणार निर्णायक; प्रशासनाची तयारी सुरू

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, अहिल्यानगर :** २०२५ ते २०३० या ५ वर्षांच्या कालावधीत निवडणूक होणार्या जिल्ह्यातील १ हजार २२३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण ग्रामविकास विभागाने दिनांक ०५ मार्च २०२५ रोजी निश्चित केले आहे. यानुसार तालुकानिहाय आरक्षण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू असून प्रवर्गनिहाय सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी लवकरच ईश्वरी चिठ्ठ्या काढण्यात येणार आहेत. ि

जल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील १ हजार २२३ ग्रामपंचायत पैकी ६२४ ठिकाणी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना सरपंच होण्याची संधी मिळणार आहे. यात ३१२ ग्रामपंचायतीचा कारभार महिलांच्या हाती येणार आहे. ३३० ग्रामपंचायतीमध्ये ओबीसी प्रवर्गासाठी सरपंचपद आरक्षित राहणार असून यात १६५ महिलांना संधी मिळणार आहे, तर ११८ ठिकाणी अनुसूचित जमातीसाठी आरक्षण राहणार असून ६० ग्रामपंचायतीमध्ये महिलाराज असणार आहे. तसेच १५० ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षण राहणार असून यात ७५ महिला सरपंचांना संधी असणार आहे. पुढील ५ वर्षांचे सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ग्रामविकास विभागाला प्रवर्गनिहाय टक्केवारी आणि लोकसंख्येचा अहवाल फेब्रुवारी महिन्यात सादर केला होता. २०११ च्या जनगणनेनुसार सादर केलेल्या अहवालात जिल्ह्यात ३६ लाख ५३ हजार ३३९ ग्रामीण लोकसंख्या असल्याचा अंदाज बांधण्यात आला होता. यात ८ लाख २७ हजार १५० ओबीसींची लोकसंख्या असून त्यांची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी २२.६४ इतकी आहे. तसेच अनुसूचित जातीची ४ लाख ४७ हजार ६९५ इतकी लोकसंख्या असून, त्यांची टक्केवारी १२.२५ आहे. तर ३ लाख ५५ हजार ३७४ अनुसूचित जमातीची लोकसंख्या असून, त्याची टक्केवारी ९.७३ टक्के असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**७ ग्रामपंचायतीच्या आरक्षणात सुधारणा जिल्ह्यातील सात ग्रामपंचायतीच्या ७ जागांसाठी जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने आरक्षणात सुधारणा करण्यात आली आहे. ओबीसी प्रवर्गातील या ७ जागांचा समावेश सर्वसाधारण प्रवर्गात करण्यात आला आहे. यामध्ये संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ, शिबलापूर, वडगाव पान, नगर तालुक्यातील हमीदपुर, पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर, पाथर्डी तालुक्यातील भिलवडे, शेवगाव तालुक्यातील आव्हाणे खुर्द येथील प्रत्येकी एक जागेचा समावेश आहे.**

# फेरीवाल्यांच्या हक्कांसाठी २ एप्रिलला ठाणे मनपा मुख्यालयासमोर ठिय्या आंदोलन

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२८, दिवा (ठाणे) :** ठाणे महानगरपालिकेतील फेरीवाल्यांच्या न्यायासाठी आणि फेरीवाला उपजीविका कायदा २०१४ प्रभावीपणे लागू करण्याच्या मागणीसाठी दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी ठाणे महानगरपालिका मुख्यालयासमोर सकाळी १० वाजता ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.

धडाकेबाज युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष अमोल केंद्रे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व करत सर्व फेरीवाल्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

**फेरीवाल्यांचा लढा - मागण्या आणि संघर्ष**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण, लायसन्स आणि मतदान अधिकारांसंदर्भात सातत्याने मागणी होत आहे. १९ मार्च २०२५ रोजी फेरीवाल्यांच्या वतीने दिवा प्रभाग कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर, २४ मार्च २०२५ रोजी ठाणे महापालिका आयुक्तांची भेट घेऊन फ ेरीवाला कायदा २०१४ च्या कलम ३ (३) अंतर्गत फेरीवाल्यांवर कारवाई न करण्याची मागणी करण्यात आली.

**महत्वाचे मुद्दे -**

फेरीवाला निवडणूक २०२५ अवैध – फेरीवाला नियम २०१६ नुसार तीन महिन्यांपूर्वी मतदार यादी प्रसिद्ध होणे आवश्यक असताना, फक्त १७ दिवसांचा कालावधी दिला गेला.

न्याय्य मतदान हक्कासाठी मागणी – २०१९ आणि २०१६ मधील चुकीच्या सर्वेक्षणामुळे ६००० फेरीवाल्यांपैकी ४६३५ फेरीवाल्यांना मतदार यादीतून वगळण्यात आले, हा अन्याय दूर करण्याची मागणी.

**स्पेशल** TVC **कमिटी स्थापन करणे** – दिवा आणि मुंब्रा येथे विभाग पातळीवर आणि ठाणे मनपात मेन ढतउ कमिटी स्थापन करावी.

**फेरीवाल्यांवर कारवाई थांबवावी** – जोपर्यंत संपूर्ण सर्वेक्षण आणि लायसन्स प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत फेरीवाल्यांना व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी.



**स्वच्छतेच्या नावाखाली होणारी जबरदस्ती थांबवावी** – ३० रुपये पावती देण्याचे थांबवून, हफ्तेवसुली करणाऱ्यांवर कारवाई करावी.

**दिनांक ०२ एप्रिल २०२५ ला ऐतिहासिक आंदोलन**

फेरीवाल्यांच्या हक्कांसाठी आणि कायद्याच्या अंमलबजावणीसाठी २ एप्रिल रोजी आंदोलन होणार असून, या लढ्यात सहभागी होण्यासाठी ठाणे महानगरपालिका हद्दीतील सर्व फेरीवाल्यांना आवाहन करण्यात आले आहे.

# पत्नीचा खून करून मुंबईला पळून जाणाऱ्या आरोपीस वाहनासह अटक

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२८, खंडाळा (सातारा) :** सातारा जिल्ह्यातील शिरवळ पोलिसांच्या सतर्कतेमुळे बेंगलोर (कर्नाटक) येथे पत्नीचा खून करून मुंबईला पळून जाणाऱ्या आरोपीस वाहनासह अटक करण्यात आली आहे. आरोपी राकेश राजेंद्र खेडेकर (वय ३५, रा. जोगेश्वरी, मुंबई) याने पत्नी गौरी (वय ३२) हिचा निर्घृण खून करून मृतदेह बॅगेत भरून घराला कुलूप लावून मुंबईच्या दिशेने पलायन केले होते.

मात्र शिरवळ पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून आरोपीला गजाआड केले.

**पत्नीने मुंबईला जाण्याचा केला आग्रह, वादातून थेट खून !**

राकेश खेडेकर आणि त्याची पत्नी गौरी हे फेब्रुवारी २०२५ मध्ये बेंगलोरच्या बनारगट्टा तेजस्विनी नगर येथे राहण्यास गेले होते. राकेश 'वर्क फ्रॉम होम' करत होता,तर गौरी नोकरीच्या शोधात होती. दिनांक २६ मार्च २०२५ रोजी रात्री गौरीने पुन्हा मुंबईला परतण्याचा आग्रह धरला. मात्र राकेशला आर्थिक तोटा होईल. या कारणाने तो तयार नव्हता. यावरून दोघांमध्ये वाद झाले. संतप्त झालेल्या गौरीने घरातील भांडी फेकण्यास सुरुवात केली आणि चक्क चाकू उचलून राकेशला धमकावले. यामुळे चिडलेल्या राकेशने तिच्याच हातातील चाकू घेऊन गौरीच्या मानेवर, गळ्यावर आणि पाठीवर वार करून तिचा निर्घृण खून केला. त्यानंतर तिचा मृतदेह घरातील मोठ्या बॅगेत भरून बाथरूमबाहेर ठेवला आणि स्वतः मुंबईला पळून जाण्याच्या तयारीला लागला. मृतदेह बॅगेत ठेवून कारने मुंबईकडे प्रयाण मार्चच्या मध्यरात्री राकेशने स्वतः च्या होंडा सिटी कारमधून मुंबईच्या दिशेने प्रवास सुरू केला. मात्र, मानसिक तणावामुळे त्याने महाराष्ट्रातील कागल येथे एका मेडिकल दुकानातून हॅर्पिक, फिनाईल आणि झुरळ मारण्याचे औषध विकत घेतले. कोल्हापूर मार्गे कराडकडे जात असताना त्याने बेंगलोरमधील आपल्या ओळखीच्या व्यक्तीला फोन करून संपूर्ण प्रकार सांगितला.



**शिरवळ येथे विषप्रयोग, पोलिसांनी वेळीच केली मदत**

खंडाळा घाट उतरल्यावर शिरवळजवळील निप्रो कंपनीच्या हायवे रोडवर आल्यावर राकेशने मानसिक तणावाखाली विकत घेतलेली कीटकनाशके पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने तो कारमधून उतरून रस्त्यावर बसला.एक मोटारसायकलस्वार त्याला पाहून थांबला आणि विचारपूस केली असता, राकेशने विष घेतल्याचे सांगितले.तातडीने दुचाकीस्वाराने त्याला कारमध्ये बसवून शिरवळ येथील जोगळेकर हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

**शिरवळ पोलिसांचा सतर्कपणा; आरोपी जेरबंद**

जोगळेकर हॉस्पिटलमध्ये शिरवळ पोलीस स्टेशनचे हवालदार कुंभार यांनी राकेशची विचारपूस केली असता त्याने पत्नीच्या खुनाची कबुली दिली. पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे यांनी तातडीने ही माहिती सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांना दिली. त्यांनी बेंगलोर पोलिसांशी संपर्क साधून घटनेची खात्री केली. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील कारवाई करण्यात आली.

**राकेशवर उपचार सुरू; बेंगलोर पोलिसांची चौकशी**

राकेशची प्रकृती गंभीर असल्याने त्याला प्रथम भारती विद्यापीठ हॉस्पिटल त्यानंतर ससून हॉस्पिटल, पुणे येथे हलवण्यात आले.

दरम्यान, बेंगलोर पोलिसांचे अधिकारी आज पहाटे ससून हॉस्पिटलमध्ये पोहोचले असून त्यांनी आरोपीची चौकशी सुरू केली आहे.

**शिरवळ पोलिसांच्या चमकदार कामगिरीने टळले मोठे संकट**

राकेश पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला पोलिसांनी वेळीच शोधून काढले. त्याने विषप्रयोग करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असला तरी नागरिक आणि पोलिसांच्या मदतीमुळे त्याला तातडीने उपचार मिळाले.

**या अधिकाऱ्यांचे विशेष योगदान**

ही संपूर्ण कारवाई सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.वैशाली कडूकर, फलटण उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे, पोलीस हवालदार कुंभार, नलावडे, धुमाळ, मोहरे, पोलीस शिपाई दीपक पाले पवार आणि होमगार्ड यांच्या चमूने ही कामगिरी केली. शिरवळ पोलिसांच्या वेगवान आणि प्रभावी कारवाईमुळे आरोपीला अटक झाली असून बेंगलोर पोलिसांच्या सहकार्याने पुढील तपास सुरू आहे.

# ओंजळभर पाणी व मुठभर धान्य उपक्रम

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, कुंडलवाडी (नांदेड) :** एकीकडे उन्हाची तीव्रता वाढत असताना मनुष्याबरोबरच पशु पक्षांचे सुद्धा पाण्याविना जीवाचे हाल बेहाल होत आहेत. अशातच कुंडलवाडी शहरातील युवकांनी ओंजळभर पाणी व मूठभर धान्य पक्षासाठी हा एक स्तुत्य उपक्रम चालू केला आहे.

या अंतर्गत गावातील पक्षी संवर्धनासाठी ठिकठिकाणी झाडांना ओंजळभर पाणी आणि मुठभर धान्य मावेल असे प्लास्टिकचे घर करण्यात आलेले असून ते झाडांना बांधण्यात आलेले आहेत. सदर के. रामलू मंगल कार्यालय मार्गापासून ते आरोग्य दवाखाना ते राजेश्वर मंदिर या रस्त्याकडे जात असताना ठिकठिकाणी झाडांना बांधण्यात आलेले आहेत.



तरीही आपण आपल्या जवळील पाणी किंवा थोडेसे धान्य यात बाजूला धान्य व आत पाणी टाकू शकता व तसेच प्रत्येकाने आपल्या घराजवळ किंवा छतावर, शेतातील झाडांवर पक्षांसाठी पाण्याची व थोड्याशा धान्याची सोय या उन्हाळ्यात करण्यात यावी. विशेष यात सर्व नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहेच. या उपक्रमाबद्दल डॉ.नरेश बोधनकर व साई भोकरे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राची दोन्ही गटात दणक्यात विजयी सलामी




**अक्षराज : संदिप येवले**
**दि.२८, मुंबई :** महाराष्ट्राच्या मुलांनी ३४व्या किशोर/किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत दोन्ही विभागात दणक्यात विजयी सलामी दिली. गया, बिहार येथील जी.डी.गोयंका पब्लिक स्कूल, रसलपूर येथील क्रीडांगणात मॅट वर झालेल्या मुलींच्या ब गटात महाराष्ट्राने मणिपूरचा ६९-११ असा धुव्वा उडविला.
आज झालेल्या पहिल्या सामन्यात झंझावाती सुरुवात करीत महाराष्ट्राने पहिल्या डावातच २लोण २८-०४ अशी भक्कम आघाडी घेतली. दुसऱ्या डावात आपल्या आक्रमणाची धार आणखी वाढवित प्रतिस्पर्ध्यावर आणखी ४ लोण देत हा विजय सोपा केला. संघनायिका सेरेना म्हस्करचा अष्टपैलू खेळ त्याला बिदिशा सोनार आणि यशश्री इंगोले यांची मिळालेली चढाई पकडीची झंझावाती साथ यामुळे महाराष्ट्राने गुणांचे अर्धशतक सहज पार केले.
महाराष्ट्राच्या मुलींच्या गटात राजस्थान व मणिपूर असे तीन संघ आहेत. आता गट विजेतेपदा करिता राजस्थानशी लढत होईल. रात्री उशीरा झालेल्या मुलांच्या सामन्यात महाराष्ट्राने इ गटात उत्तरांचलचा ६२-२८ असा सहज पराभव करीत विजयी सलामी दिली. आक्रमक सुरुवात करणाऱ्या महाराष्ट्राने पूर्वार्धात ३ लोण देत ३३-१० अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात त्याच जोमाने खेळत आणखी २लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले. उत्तरार्धात मात्र उत्तरांचलने बऱ्यापैकी प्रतिकार केला. पण एकाही लोणची ते परतफेड करू शकले नाही.त्यामुळे उत्तरांचलला ३४ गुणांच्या मोठ्या फरकाने पराभवाचा सामना करावा लागला.
तुकाराम दिवटे, आर्यन पवार यांचा अष्टपैलू खेळ, त्याला मनीष काळजे याची मिळालेली चढाईची व ऋतुराज महानवर, सारंग उंडे यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हा विजय सहज शक्य झाला. महाराष्ट्राचा समावेश इ गटात असून, महाराष्ट्र सह मध्य प्रदेश, उत्तरांचल हे अन्य दोन संघ या गटात आहेत. या विजयाने महाराष्ट्राने बाद फेरी गाठण्याचा मार्ग मोकळा केला.

# राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात २५ कोटी ४४ लाखांचे अनुदान जमा

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२८, मुंबई :** राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले.
जानेवारी,फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्याचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रति गाय रु.५०/- अनुदान योजनेंतर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.
महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य गोसेवा आयोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विभागाचा विकास गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधिक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष, सदस्य,अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.
पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून,देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे,म्हटले आहे.देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड - अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पुशधन गोशाळेत ठेवण्यात येतात. अशा गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी असलेल्या गोशाळेतील गायींना ५०/- रुपये प्रती दिन गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे.
ही योजना राज्यातील शेकडो गोशाळांना दिलासादायक ठरली असून,यातून आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले. ऑनलाईन अनुदान वितरण प्रसंगी आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

**असे आहे योजनेचे स्वरुप -**
महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रति दिन अनुदान देय राहील. अनुदानाची रक्कमः रुपये ५० /- प्रती दिन प्रती देशी गाय असे आहे.

**अनुदान पात्रतेच्या अटी**
महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र आहेत. संस्थेस गोसंगोपनाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असावा. गोशाळेत किमान ५० गोवंशीय पशुधन असणे आवश्यक आहे. संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगिंग करणे अनिवार्य आहे. ईअर टॅगिंग झालेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र आहे. संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

# वाशिम जिल्ह्याच्या विकासाला गती देणार - पालकमंत्री भरणे




**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१५, वाशिम :** जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास तसेच औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शुक्रवार, दिनांक २८ मार्च २०२५ रोजी जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेतला. बैठकीला जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका असलेल्या अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.
आमदार भावना गवळी, बाबूसिंग महाराज, श्याम खोडे, किरणराव सरनाईक, सई डाहाके यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे उपस्थित होते. त्यांनी आगामी गुढीपाडवा आणि रमजान ईदच्या सर्व जिल्हावासियांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. दरम्यान जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या पॉम्पलेट पत्राचे विमोचन उपस्थित मान्यवरांनी केले. वाशिम जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत ते म्हणाले की, पालक म्हणून या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यावर आपला विशेष भर असेल. जिल्हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला असल्याचे नमूद करत श्री. भरणे यांनी या भागाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. नीती आयोगाने वाशिमला आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित केले असून, ही ओळख पुसून टाकण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला. सर्व समाज बांधवांना कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करता समान न्याय मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. जिल्ह्यात शांतता, बंधुभाव, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हा प्रशासनाला सूचना देण्यात आल्या असून, कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.
जिल्ह्यातील रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी पालकमंत्री म्हणून विशेष प्रयत्न करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे. वाशिम जिल्ह्याला लाभलेला ऐतिहासिक वारसा लक्षात घेऊन विकासाला गती देण्याचे ही त्यांनी आश्वासन दिले. महायुती सरकारचा घटक म्हणून सर्वांना समान वागणूक आणि सन्मान मिळेल, असे त्यांनी नमूद केले. विशेषतः जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सिंचनाच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.
यावेळी पालकमंत्री भरणे यांनी जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन केले. जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांना शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे राज्यस्तरीय प्रगती पुरस्कारात प्रथम क्रमांक मिळाला.
तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांना राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सर्वोत्कृष्ट कल्पना व उपक्रम यात प्रथम क्रमांक, आणि जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना पाचव्यांदा राज्यात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.
जिल्ह्यात अनेक विकासकामांची गरज असल्याचे मान्य करत पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी विशेष लक्ष देण्याचे ठरवले आहे. त्यांच्या या भेटीमुळे जिल्ह्यातील विकासाला नवीन दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# थोडक्यात

## खापरखेडा महाराष्ट्र विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन



**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.२८, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील शालेय जिवनातील माजी विद्यार्थी तब्बल ३५ वर्षांनंतर एकत्र भेटल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. गुलशन प्लाझा येथे माजी विद्यार्थी स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शालेय जीवनाच्या आठवणींना बळकटी देत विद्यार्थ्यांचे मन भारावून गेले.याप्रसंगी सत्र १९९०-९२ बॅच मधील काही माजी विद्यार्थ्यांना पन्नास वर्षे पूर्ण झाल्याने केक कापून एकमेकांचे अभिनंदन करीत शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रम दरम्यान या निमित्ताने विविध सांस्कृतिक, करमणूक कार्यक्रम आयोजित केले गेले. या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक मनोज जामगडे यांनी सर्व मित्रांना एकत्रित केले. यावेळी शिरीष निंबाळकर यांनी जंगल इन द जंगल सारख्या कविता सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. तद्नंतर मुलामुलींनी सुमधुर संगीत, नाट्य प्रस्तुत करुन इतर मित्रांनीही आपली मनोगत व्यक्त केले. आणि बालपणातील आठवणी परत आणल्या. यावेळी जुन्या आठवणींसह सद्या परिस्थिती लक्षात ठेवून एकमेकांना सहकार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे पुन्हा शाळेच्या आठवणी परत आणल्या. एकदा बालपणाच्या आनंदाचा प्रत्यय मनात आला. या कार्यक्रमाद्वारे, आजच्या काळात जुन्या कुटुंबाचे महत्त्व लक्षात आले. बर्याच जणांनी त्यांच्या उच्चशिक्षित स्थान असून ही एकमेकांचे आनंद सामायिक केले. कार्यक्रमामध्ये डॉ.माधुरी चांदेवार, डॉ.हेमलता नांदुरकर, एड. सुशीला गायकवाड, प्राध्यापिका हेमलता गोंडाने, सुनंदा मेश्राम, माधुरी भांडारकर, वनिता सोनकुवर, नरेंद्र दापूरकर, पुरुषोत्तम भड, राजाराम वाघधरे, राजेश दुगाने, शिरीष निंबाळकर, श्रावण वाघ, उमेश गजभिये, विनायक लकडकर, सुरेश ठवरे,मनोज जामगडे आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

## अपर्णा खामकर यांनी मानले आ.दाते यांचे आभार



**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील राळेगण सिद्धी येथे सरकारी दवाखान्याला कामगारांची मागणी. हा मुद्दा आमदार दाते यांनी विधानभवनात मांडला. त्याचा राळेगण सिद्धी तसेच शेजारील सर्वच गावांना फायदा व लाभ होणार आहे. असे राष्ट्रवादी काँग्रेस युवती अध्यक्षा अपर्णा खामकर यांनी सांगितले. तसेच मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने कॉलेजच्या बाहेर पोलीस ठाण्याची मागणी करून रोडरोमीओचा बंदोबस्त करण्यासाठी तसेच मुलींसाठी तक्रार पेटी प्रत्येक कॉलेजमध्ये असावी असे त्यांनी सांगितले. १० वी १२ च्या मुलींना कुठल्याने प्रकारचे शैक्षणिक दाखले तसेच ऍडमिशन संदर्भात कुठलेही अडचण येत असेल तर संपर्क करण्याचे आवाहन युवती तालुका अध्यक्षांनी केले.

## भावसार समाजाच्या वतीने हिंगलाज माता प्रकट दिन साजरा




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.२७, लासलगाव (नाशिक) :** दिनांक २७ मार्च २०२५ रोजी लासलगाव येथे लक्ष्मीनारायण मंदिरात हिंगलाज माता प्रकट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सालाबाद प्रमाणे या ही वर्षी भावसार क्षत्रिय समाजाच्या वतीने पारंपारिक पद्धतीने हा उत्सव साजरा करतांना हिंगलाज माता व रेणुका मातेच्या प्रतिमेला पुष्पहार घालून महिलांनी मनोभावे पूजा करून पारंपरिक नृत्य भावसार समाजाच्या महिलानि सादर केले. त्यानंतर जमलेला भावसार समाज व पंचक्रोशीतील भाविक यांच्या हजेरीत देवीला चने व डाळ बाटीचा नैवेद्य दाखवून क्षत्रिय भावसार समाजाचे अध्यक्ष अमित भावसार यांच्या हस्ते सप्तमीक महाआरती करण्यात आली. नवनिर्वाचीत समाजाचे ट्रस्टीने कार्यक्रमाचे नियोजन अतिशय सुंदर असे केले होते. मागील वर्षापर्यंत हा उत्सव फक्त लासलगाव भावसार समाजापूरता मर्यादित होता. यावर्षी पहिल्यांदाच पंचक्रोशीतील मान्यवरांना आमंत्रित केले गेले होते. महाआरती झाल्यानंतर लगेचच पंचक्रोशीतील ४०० ते ५०० उपस्थितांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. समाजातील तरुण पिढीने यावेळी मोलाचे सहकार्य केले. लासलगाव भावसार समाजातील जेष्ठांनी नवनिर्वाचित कमिटीने केलेल्या या कार्याचे भरभरून कौतुक केले.

## दैनंदिन जीवनात पौष्टिक तृणधान्याचा खाद्य पदार्थामध्ये वापर करावा - जिल्हाधिकारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२८, हिंगोली :** पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील महत्व लक्षात घेता सर्वांनी आपल्या दैनंदिन जीवनात पौष्टिक तृणधान्याचा खाद्यपदार्थात वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी केले. हिंगोली, सेनगाव व कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी येथील महावीर भवनामध्ये नुकतेच 'जिल्हास्तरीय पौष्टिक तृणधान्य महोत्सव-२०२५'चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तोंडापूर कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख समन्वयक पी.पी.शेळके हे होते.
जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले, पौष्टिक तृणधान्य अंगणवाडीतील मुलांच्या आहारात समाविष्ट करता येईल. कृषी सहाय्यकाच्या माध्यमातून पौष्टिक तृणधान्यांच्या विविध पाककृती अंगणवाडीतील मुलांच्या दैनंदिन आहारामध्ये पोहोचविण्याबाबत तसेच पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व शेतकरी व नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी व्यापक प्रमाणावर प्रसिद्ध करण्याचे आवाहन ही त्यांनी यावेळी कृषी विभागाला केले.